5




पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ २, मुंबई यांचे कार्यालय
बोरीवली पोलीस ठाणे, २ रा मजला, एस.व्हि. रोड, बोरीवली (प), मुंबई.
पिन - ४०००९२ दूरध्वनी क्र. ०२२-२८९०३८९९

**प्रेस नोट** **दि.१८/०९/२०२६**

**उत्तर परिमंडळ २ मधील पोलीस ठाणे अंतर्गत दाखल गुन्हयांतील १,७३,०१,५५४/- रुपयांचा** (एक कोटी त्र्याहत्तर लाख एक हजार पाचशे चोपन्न रुपये) **हस्तगत मुददेमाल मुळ मालक यांना वितरित केल्याबाबत**

बृन्हमुंबई पोलिस आयुक्तालय, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई मधील उत्तर परिमंडळ २ अंतर्गत पोलीस ठाणे हद्दीत गुन्हयास प्रतिबंध व दाखल गुन्हयांचा शोध घेवुन गुन्हेगारांना शिक्षा, त्याचप्रमाणे नागरिकांची सुरक्षितता व सेवेचा भाग म्हणून, उत्तर परिमंडळ-२ अंतर्गत येणाऱ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दाखल गुन्ह्यांमध्ये तपासादरम्यान हस्तगत करण्यात आलेले सोन्याचे दागिने, मोबाईल फोन, मोटार वाहने आणि रोख रक्कम इत्यादी मालमत्ता कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आज दिनांक १८/०९/२०२६ रोजी मा. पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ - २, मुंबई यांचे हस्ते फिर्यादींना कांदिवली पोलीस ठाणे येथे आयोजित केलेल्या भव्य कार्यक्रमात सन्मानाने परत करण्यात आली.

**परत करण्यात आलेल्या मुददेमालाचे वर्णन:-**

**१) सोने व दागिने**:- उत्तर परिमंडळ -२ अंतर्गत येणाऱ्या पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयातील रू. ९०,४४,०००/- (नव्वद लाख चौवेचाळीस हजार) किंमतीचे मुल्यमापन केलेले ६८४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने.

**२) मोबाईल फोन**:- उत्तर परिमंडळ -२ अंतर्गत येणाऱ्या पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयातील व सीईआयआर पोर्टल मार्फत हस्तगत एकुण रू. ५१,२०,०००/- एक्कावन्न लाख वीस हजार रूपये) किंमतीचे विविध कंपनीचे एकूण ३४८ मोबाईल फोन. (कांदिवली -१२०, मालवणी - ८२, एम.एच.बी.कॉलनी - ६५, बोरीवली - ६०), चारकोप -१९ व गोराई - २)

**३) रोख रक्कम व ऑनलाईन तक्रारींची रक्कम**: - रू. २२,८७,५५४/- (बावीस लाख सत्यांशी हजार पाचशे चोपन्न) त्यामध्ये रोख रक्कम रू. ८,५२,५८६/- व एनसीआरपी ऑनलाईन तक्रारी मधील रू. १४,३४,९६८/-

**४) मोटार वाहने**:-रू. ८,५०,०००/-(आठ लाख पन्नास हजार) किंमतीच्या एकूण १३ दुचाकी मोटर सायकल व ०१ ॲटो रिक्षा. (कांदिवली - ८, बोरीवली -३, एम.एच.बी.कॉलनी -२ व गोराई - १)

उत्तर परिमंडळ -२, मुंबई अंतर्गत पोलीस ठाण्यांतील अधिकारी व अंमलदार यांनी उत्कृष्ट कामगिरी करत वेगवेगळया गुन्हयातील रू.१,७३,०१,५५४/- ( एक कोटी त्र्याहत्तर लाख एक हजार पाचशे चोपन्न रुपये) ची मालमत्ता हस्तगत करण्यात यशस्वी ठरले आहेत.

सदरची कामगिरी मा.श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृन्हमुंबई, मा. श्री. मनोजकुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त (का. व सु.), मा. श्री. शशिकुमार मीना, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री. संदीप घुगे, पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-२, मा. श्री. संतोष धनवटे, सहाय्यक पोलीस आयुक्त, बोरीवली विभाग, मुंबई, मा. श्री. महेशकुमार ठाकुर, सहाय्यक पोलीस आयुक्त, मालवणी विभाग, मुंबई, मा.श्री. सुधाकर हुंबे, सहाय्यक, पोलीस आयुक्त, गोराई विभाग, मुंबई तसेच सर्व पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोनि (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी, सायबर गुन्हे प्रकटीकटीकरण अधिकारी, इतर अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

<u>नमुद कार्यक्रमाचे छायाचित्रे खालीलप्रमाणे आहेत</u>




.....................